# लोखंडी सेंट्रींग प्लेटा चोरुन नेणारे चोरटे सेलु पोलीसांचे जाळ्यात

दि. १३.०९.२०२१ रोजी फिर्यादी नामे विमलकुमार श्रीरामप्रकाश तिवारी यांनी पोलीस स्टेशन सेलु येथे तक्रार दिली कि, फिर्यादी हे अँफकॉन इनफ्रास्ट्रक्चर लिमीटेड कंपनीमध्ये काम करीत असुन त्यांचे कंपनीतर्फे रमना फाटा येथील पुलाचे बांधकाम सुरु असुन पुलाचे कामाकरीता लोखंडी सेंट्रींग प्लेटा ठेवलेल्या होत्या त्यापैकी ८ लोखंडी सेंट्रींग प्लेटा वजन अंदाजे ६०० किलो कि. २४,०००/- रु. चा माल दि. १२.०९.२०२१ चे १९.०० वा. ते दि. १३.०९.२०२१ चे ०७.०० वा. चे दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेला. अशा फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सेलु येथे अप.क्र. ४९३/२०२१ कलम ३७९, ३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद आहे.

सदर गुन्ह्याचे तपासात यातील आरोपी व चोरी गेलेल्या मुद्देमालाचा शोध घेत असतांना आरोपी क्र. १) अनिल लक्ष्मण ठाणेकर, रा. जोशीनगर, सेलु, २) सुरज भोजराजजी ढोबळे, रा. घोराड, ३) रितेश तुळशीदास नरताम, रा. घोराड, ४) अनिकेत अभय माहुरे, रा. वार्ड क्र. 2 सेलु, ५) शंकर भिमराव करनाके, रा. घोराड हे त्यांचे ताब्यातील मालवाहु वाहनात वरील चोरीस गेलेला मुद्देमाल विकायला घेवुन जात असतांना मिळुन आले. सदर आरोपीतांना गुन्ह्याबाबत विचारपुस केली असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिल्याने त्यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन १) ८ लोखंडी सेंट्रींग प्लेटा वजन अंदाजे ६०० किलो कि. २४,००० रु., २) गुन्हा करणे करीता वापरलेला एक जुना वापरता मालवाहु अँटो क्र. एम.एच.-३१/डि.एस.-३८३५ कि. ७०,०००/- रु. असा एकुण किंमत ९४,००० रु. चा माल जप्त करून गुन्हा उघडकीस आणला.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. प्रशांत होळकर, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. यशवंत सोळंके, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, वर्धा श्री. पियुष जगताप यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक पो.स्टे. सेलु श्री. रविन्द्र गायकवाड यांचे निर्देशाप्रमाणे पोलीस अंमलदार अखिलेश गव्हाणे, सचिन वाटखेडे, नारायण वरठी, कपील मेश्राम सर्व नेमणूक पोलीस स्टेशन सेलु यांनी केली.